# मारूती पांडुरंग काशीद

जून १९७३ मधला एक दिवस. आमची मुंबई-मलकापूर बस धुरळा उडवत वारणानगरमध्ये अवतीर्ण झाली. एरवी पहाटे पोहोचणारी ती बस लेट झाल्यामुळे सकाळचे ११/११:३० वाजले होते. आम्ही आळोखे-पिळोखे देत, रात्रभर बसमध्ये बसून आंबलेली शरीरे व बॅगा कशीबशी खेचत खाली उतरलो, आणि बस अजून एक धुरळ्याचा लोट उडवत पुढे निघून गेली. मी समोर पाहतो तो काय, रस्त्याच्या पलीकडे एक शाळेसारखी दिसणारी लांबलचक आडवी इमारत होती. रस्ता आणि शाळा यांच्या मध्ये असलेल्या पटांगणात खाकी गणवेश घातलेली १००-२०० मुलेमुली रांगेत शाळेच्या दिशेने तोंड करून उभी होती. त्यातली काही माना वळवून आमच्याकडे पाहात होती. कोण बुवा ही मंडळी अशा हेतूविरहित उत्सुकतेने! त्या काळात ११ वाजता शाळा भरे व ५ वाजता सुटे. उन्हात उभे राहून दाणी सरांचे (त्यावेळचे हेडमास्तर) भाषण ऐकून कंटाळलेल्या मुलांसाठी रस्त्यावर चाललेली आवकजावक जास्त मनोरंजक होती!

लवकरच मला समजले की ती माझीच शाळा होती – श्री वारणा विद्यालय. वारणानगरचे प्रथम दर्शन शाळेच्याच रूपात व्हावे हा केव्हढा मोठा शुभशकुन होता! काही महिन्यांतच शाळेत “महाबळेश्वरवाला” अशा लांबलचक नावाच्या एका नव्या अद्भुत व्यक्तीचे “प्राचार्य” म्हणून आगमन झाले आणि शाळेची वेळ ८ ते ६ झाली!

मी त्यावेळी इयत्ता सहावीत होतो, म्हणजे तसा अगदीच कुक्कुलं बाळ नव्हतो. उलट माझ्या मानसिक आणि शारीरिक प्रगतीचा खरा कालखंड त्यावेळी सुरू झाला होता. आणि अशा formative वयात मी श्री वारणा विद्यालयात होतो आणि मला महाबळेश्वरवालांसारखे शिक्षक आणि मारूती काशीदसारखे मित्र मिळाले हे माझे परमभाग्य समजतो! पुढची

सात वर्षे एखाद्या स्पंजसारखे मी वारणानगरमध्ये विविध अनुभव घटाघट पीत गेलो आणि अंतर्बाह्य समृद्ध होत गेलो.

मारूती उर्फ बाळू हा त्यावेळी आमच्या इयत्तेचा अव्वल स्कॉलर विद्यार्थी होता. काळ्या फ्रेमचा चष्मा घातलेला त्याचा चेहरा थोडा चौरस, लगेच आकर्षून घेणारा होता. डोळे शांत, गंभीर असे होते. अंगापिंडाने तो उंचापुरा, मजबुत शरीरयष्टीचा होता. त्याच्या चालण्या-वागण्यात एक प्रकारचा भारदस्तपणा होता, सहावीच्या वयाला न शोभणारी maturity होती. वर्गाचा तो लीडर आहे हे त्याच्याकडे पाहिल्यावर लगेच ध्यानात यायचे. सगळे शिक्षक बाळूला प्रेमाने वागवायचे. एखादा प्रश्न विचारल्यावर सगळा वर्ग शांत असला की त्याचे उत्तर देण्याचे कर्तव्य बाळू पार पाडी. मारूती काशीदने मलाही लवकरच आकर्षून घेतले.

खरे तर हुशार मुले पुढच्या रांगांत बसतात. पण त्याच्या उंचीमुळे बाळू शेवटच्या रांगेत बसायचा. आणि मी कुठेतरी मध्ये. पुढे लवकरच आमची मैत्री झाली. सुरूवातीला ती बहुतेक एकतर्फीच होती – म्हणजे मी बाळूचा फॅन होतो आणि बाळूसाठी मी त्याच्या अनेक फॅन्सपैकी एक होतो! वर्गात काहीही मनोरंजक झाले, शिक्षक काहीतरी interesting अथवा विनोदी अथवा अनवधानाने चुकीचे बोलले की मी मान वळवून बाळूची प्रतिक्रिया काय झाली हे पाहायचो. आमची नजरानजर होऊन त्याने स्मित केले की मला कमालीचा आनंद व्हायचा. जणू मला जे वाटले ते त्यालाही वाटतेय म्हणजे मी मूर्ख नाही अशी endorsement मिळाल्यासारखे वाटायचे.

बाळू सर्वच विषयांत हुशार होता. पण त्यातही त्याचे मराठी भाषेवर अतीव प्रेम होते आणि मराठीतले त्याचे प्रभुत्व वादातीत होते. निबंधस्पर्धा, वक्तृत्वस्पर्धा यात तो नेहमी भाग घ्यायचा व सर्व बक्षीसे पटकावयाचा. त्याच्याबरोबर त्याला अगदीच एकटे वाटू नये म्हणून मी व इतर काही विद्यार्थी जात असू, पण तो आमचा अव्वल खेळाडू होता व आम्ही फक्त

त्याला नैतिक पाठिंबा द्यायला म्हणून जात असू. आमचे मराठीचे शिक्षक उद्धव भास्कर देशपाडे – ज्यांची अंगकाठी त्यांच्या “उभा” या नावाला साजेशी होती – बाळूवर अगदी खुश असायचे. त्या दोघांच्या विविध साहित्यावर, कवितांवर गप्पा व्हायच्या. त्या मी उत्सुकतेने ऐकायचो व कधी भाग घ्यायचा प्रयत्न करायचो. या द्वयीमुळे माझेही मराठी भाषेवर व साहित्यावर प्रेम वृद्धिंगत झाले असे म्हणणे अतिशयोक्ती होणार नाही.

बाळूचे मराठी सुंदर होते. तो कविताही सुंदर लिही. त्याचे वाचनही अफाट होते. वर्गात एखादे शिक्षक रजेवर असले, किंवा शिक्षकांनाच शिकवायचा कंटाळा आला की त्या पिरीयडला “वर्गात कोणाला गोष्ट सांगायची आहे का” अशी विचारणा व्हायची. बाळू नेहमी तयार असायचा. त्याच्या कथा ऐकण्यात आम्ही सर्व अगदी रंगून जात असू. मुद्देसूद, योग्य ठिकाणी भर देऊन, सावकाश गतीने तो अतिशय प्रभावी पद्धतीने बोलत असे. त्याला डिटेक्टिव्ह गोष्टींत, साहसकथांत विशेष रस होता. त्यामुळे पोलीस कथा, मर्डर मिस्टरी अशा सांगून तो सगळ्या वर्गाला तासभर खिळवून ठेवी. एखादा खून झाला किंवा तत्सम काही अंगावर काटा येणारी घटना घडली की मुलींच्या रांगेतून चक्क उसासे सोडल्याचे आवाज येत!

मुलींवरून आठवले! बाळूला – आम्हा इतर नॉर्मल मुलांप्रमाणेच – मुलींविषयी आकर्षणवजा कुतुहल होतेच! पण त्याची स्वभावतः असलेली परिपक्वता त्याला फालतुगिरी करू देत नव्हती, “लाईन मारणे” वगैरे उद्योग करू देत नव्हती. मुलींमध्ये प्रिय असला तरी तो त्यांच्यापासून दोन पावले दूरच राहायचा. मुलींना आकर्षित करायचे असेल तर आपल्या वागण्या-बोलण्यात maturity हवी, “जन्टलमन”गिरी हवी, असे तो म्हणे. मुलींसमोर आपल्याकडून काही बालिशपणा होणार नाही, आपण चेष्टेचा विषय होणार नाही, किंवा आपला उपमर्द होणार नाही, याविषयी तो अतिशय जागरुक असे. कधी-कधी त्याचा अतिरेकही होई, पण त्या पौगंडावस्थेत सर्वच मुले मुलींच्या बाबतीत कमालीची self-conscious

असतात हे सत्य आहे. त्याला बाळू कसा अपवाद असेल! मला आठवतेय एकदा वर्गात दोन रांगांतून चालत असताना बाळूचा चष्मा धक्का लागून खाली पडला. तर त्याला तो अपमान वाटला! कुठल्याही मुलीने ते पाहिले की नाही कोणास ठाऊक! पण बिचारा बाळू दिवसभर त्या घटनेविषयी अस्वस्थ होता व वारंवार बोलून दाखवत होता की असे होता कामा नये!

खरे तर त्या वयात आमच्या वर्गातल्या मुलींना एव्हढी मुलांना judge करण्याइतकी समज होती की नाही, किंबहुना त्यांच्या भावविश्वात आम्ही मुले खिजगणतीत तरी होतो की नाही याविषयी मला दाट शंका आहे. पण आम्ही "नॉर्मल" मुले असल्याने आम्हाला मुलींविषयी तुफान आकर्षण होते. त्यांच्या सौंदर्याविषयी व अद्भुत (अर्थात काल्पनिक) व्यक्तिमत्वाविषयी आम्ही चर्चा करत असू. मराठी साहित्याच्या वाचनामुळे, वपुंसारख्यांचे रोमँटिक लेखन वाचल्यामुळे आम्ही जरा जास्तच रोमँटिक होतो की काय असे मला वाटते. अगदी सहजगत्या मुलींच्या प्रेमात पडत असू. ते आकर्षण पूर्णतः "अनामिक"च म्हटले पाहिजे, कारण त्या आकर्षणाला शारीरिक किंवा दुसरे कुठलेही परिमाण नव्हते. मुलींकडून काही अपेक्षाही नव्हती. बस्स त्यांनी आमच्या अस्तित्वाची दखल जरी घेतली तरी पुरे अशी मनोधारणा होती.

मला आठवते, मी सातवी-आठवीत एका मुलीच्या प्रेमात पडलो. त्या मुलीला त्याचे काहीही ज्ञान नव्हते. सगळे माझ्याच मनाचे खेळ. पण मी तिच्या प्रेमात इतका वेडा झालो की बस्स. एका रविवारची गोष्ट. मी गावातल्या रस्त्यावर एका झाडाखाली काही कामासाठी (की कुणाची वाट बघत) थांबलो होतो. तेव्हढ्यात दुरून ही मुलगी तिच्या एक-दोन कुटुंबियांबरोबर चालत येताना दिसली. बापरे! माझी अवस्था बिकट झाली आणि मिनिटागणिक ढासळत गेली. जशी ती जवळ-जवळ येत होती तसा माझ्या अंगाला अर्जुनासारखा कंप सुटू लागला, घाम फुटू लागला. जेव्हा

ती अगदी समोर आली तेव्हा तर मी चक्कर येऊन पडतो की काय अशी भीती वाटू लागली!

मागे वळून पाहाता या प्रसंगाचे हसूच येते. हा सर्व प्रकार त्या मुलीच्या खिजगणतीतही नव्हता. ती आपल्याच तारेत भावा-बहिणींशी गप्पा मारत चालली होती. तिने बहुधा मला झाडाखाली उभे असलेले पाहिलेही नव्हते. मी मात्र अगदी अंतिम युद्धाचा समय आल्यासारखा झालो होतो! मुला-मुलींतल्या आकर्षणाची ही कमालीची शक्ती पाहून आता नवल वाटते. जगातले बहुतेक सर्व साहित्य आणि कला "प्रेम" या विषयावर आहेत यात नवल ते कुठले!

सुदैवाने काही महिन्यांतच मी त्या प्रेमरोगातून बरा झालो. हृदयात तर सोडाच, पायापाशीही जागा द्यायची त्या मुलीची तयारी नसल्याचे लवकरच ध्यानात आले. आपला प्रेमभंग झाला आहे अशी खूणगाठ मनाशी बांधून मग मी दुसऱ्या कुठल्या मुलीच्या प्रेमात पडता येईल या विचारात रममाण झालो.

आता विचार करता असे वाटते की, त्या कोवळ्या वयात प्रेमात पडणे ही प्रत्येक मुलाची भावनिक गरज असते. Adult जगातील कुठलीच जाणीव अथवा विकृती त्या प्रेमात नसते. केवळ मुलींशी संवाद व्हावा, जमल्यास मैत्री व्हावी एव्हढीच माफक अपेक्षा असते. आपल्या मागासलेल्या समाजपद्धतीमुळे असेल किंवा अपरिपक्व वयामुळे असेल, बहुतेक मुलींना या प्रकारात फारसा रस नसायचा. पण "मुलीच्या मागे लागला" म्हणून बापाने झोडपले, किंवा "अमुक मुलाचे लफडे आहे" अशा बातम्या ऐकल्या की वाईट वाटते. "लफडे" म्हणजे काय हे फक्त त्या बापालाच पक्के अवगत असते!

वारणानगरमध्ये आधुनिक विचारसरणीचे खूप लोक असले तरी खुद्द तो परिसर खेड्यांनी वेढलेला असा होता, मागासलेल्या विचारसरणीचा होता. त्यामुळे मुले आणि मुली यांच्यात अजिबात संवाद नव्हता. आजच्यासारखे गप्पा मारणे व एकत्र फिरणे दूरच राहिले, एखादा मुलगा एखाद्या मुलीशी एक वाक्य जरी बोलला तरी त्याला बाकी सगळे चिडवून, भंडावून सोडत. मैत्री राहिली दूर, एकमेकाच्या तक्रारी करणे हेच प्रकार जास्त होते. म्हणजे मुलीच आमच्याविषयी तक्रारी करण्यात पुढे असायच्या! एकमेकाचे नाव उच्चारणेदेखील वर्ज्य होते. एकदा एक गंमत झाली. मराठीच्या वर्गात मोठ्याने पुस्तकवाचन करणे हा एक उपक्रम अधुनमधुन असे. मराठीच्या पुस्तकात एक धडा होता, ज्यात अभय नावाचा मुलगा व त्याचे आश्रमातले जीवन असे काहीतरी वर्णन होते. नेहमीप्रमाणे आमच्या शिक्षकांनी हा धडा वाचनास घेतला. मोठ्याने वाचताना मुली जाम माझे नाव घेईनात. तो शब्द गाळून त्या वाचत राहिल्या. शिक्षक खवळले – हा काय प्रकार आहे! पण मुलींनी शेवटपर्यंत दाद दिली नाही. त्या माझे नाव गाळूनच वाचत राहिल्या. अर्थात मला या सगळ्या नाटकामुळे मात्र गोड गुदगुल्या होत राहिल्या!

आमच्या मोघे बाईंनी एकदा फतवा काढला. त्या म्हणाल्या, "आपल्या समाजात जी विषमता आहे, स्त्रियांवर अन्याय होतात, त्यांचा उपमर्द होतो, याचे मूळ शाळांतून आहे. मुले आणि मुली यांच्यात सौहार्द नाही, संवाद नाही. हे बदलले पाहिजे." हे ऐकल्यावर बाळू आणि माझ्यासारखे रोमँटिक अर्थातच excite झाले. मोघे बाईंचा प्रस्ताव – मुले आणि मुली एका बाकावर बसले पाहिजेत – आम्ही उत्साहाने उचलून धरला आणि कुठल्या दिवशी कुठला मुलगा व मुलगी शेजारी-शेजारी बसतील याचे आम्ही कॅलेंडर आखले! मला आठवतेय या कॅलेंडरमध्ये एका पिरीयडला मी आणि सुरेखा माने एका बाकावर बसण्याचा योग आला. आम्ही दोघे शक्य तितके दूर बाकाच्या अगदी कडेला बसलो होतो. या सगळ्या उपद्व्यापात मोघे बाईंचा हेतू मुला-मुलींनी बोलावे असा होता. सुरेखा तर तोंड

उघडायच्या अजिबात मूडमध्ये दिसत नव्हती. शेवटी हिय्या करून व तिने घड्याळ घातले आहे हे हेरून मी तिला विचारले, "किती वाजले?" आणि लगेचच तास संपल्याची घंटा वाजली!!

असा हा मोघे बाईंचा अभिनव प्रयोग काही महिनेच टिकला. एक राऊंड पूर्ण झाल्यावर मुली परत आपल्या रांगेत जाऊन बसल्या व त्यांनी तिथून उठण्यास साफ नकार दिला!!

बाळू उपजतच लीडर असला तरी त्याची गँग अशी नव्हती. आमच्या वर्गात अनिल पाटील हा अजून एक नॅचरल लीडर होता. त्याच्याभोवती कायम ९-१० मुलांचा गराडा असे, व मधमाश्या एकत्र घोंघावतात तशी ही मुले अनिलच्या मागे-मागे असत. तसे बाळूच्या भोवती मुले घोंघावताहेत असे क्वचित दिसायचे. त्यामागे कदाचित बाळूचा समाजात स्वतःची इमेज सांभाळण्याकडे कल हे एक कारण असेल. पण त्यापेक्षा मला असे वाटते बाळू त्याच्या मनात खोल कुठेतरी एकटा होता व त्याची त्याला सवय होती. खऱ्या लीडरप्रमाणे एकट्याने साहस अंगावर घेण्याची त्याची तयारी होती. त्याच्याकडे आकर्षित होऊन मग आम्ही आपोआपच त्याच्या मागे-मागे जायचो.

वारणानगर हे एक चहूबाजूंनी खेड्यांनी वेढलेले चिमुकले शहरच होते. भर समुद्रातल्या एखाद्या बेटासारखे. निव्वळ तिथल्या शहरी सोयी, डांबरी रस्ते व समृद्धीमुळे नव्हे, तर तिथे काम करणारे बहुतांश लोक बाहेरून आलेले, शहरी संस्कृतीत भिजलेले होते. समुद्राच्या लाटा जशा सतत त्या बेटावर आदळत असतात तसे ग्रामीण जीवनाच्या व संस्कृतीच्या लाटा वारणानगरच्या जीवनावर आपला प्रभाव दाखवत होत्याच. बाळूचे गाव बहिरेवाडी – जे अगदी खेड्याहून खेडे होते असे म्हणता येईल. बाळूच्या व्यक्तिमत्त्वात खेडुतपणा अजिबात नव्हता. त्याचे बोलणे, वागणे वारणानगरच्या कोणाच्याही तोंडात मारेल असे होते. पण त्याचबरोबर

त्याच्या हृदयात ग्रामीण जीवनाविषयीचे प्रेम ओतप्रोत भरलेले होते. ग्रामीण जीवनाची त्याला अचूक नाडीही माहित होती. त्याच्याबरोबर बहिरेवाडी, जाखले, पोखले, माले अशा जवळपासच्या खेड्यांतल्या रानांतून, टेकड्यांवरून हिंडणे ही माझ्यासाठी अपूर्व आनंदाची गोष्ट होती. आम्ही तिथल्या आमच्या वर्गमित्रांना अचानक भेटी देत असू, त्यांच्या शेतातला हुरडा किंवा भुईमुगाच्या शेंगा खात असू. जाखल्याचा बाजीराव पाटील हा असाच एक अवली वर्गमित्र. रोज जाखल्याहून तो शाळेची ये-जा करायचा. अतिशय प्रेमळ पण तितकाच लाजरा-बुजरा. त्याला माझ्या घरी बोलवायचा मी कितीवेळी प्रयत्न केला असेन, पण पठ्ठ्या जेमतेम आमच्या बिल्डींगपर्यंत यायचा. जिना चढून वर घरी यायला जाम लाजायचा.

बाळूच्या बहिरेवाडीतल्या घरी मी अनेकदा गेलो. मला नॉन-व्हेजचे कुतुहल आहे हे समजल्यावर तो मटण-चिकन असे काही घरी केले असले की मला घेऊन जायचा. बाळूची आई – आपल्या लेकराचा मित्र म्हणजे अगदी लेकरासारखाच या भावनेने आग्रह करणारी ती माऊली – अगदी प्रेमाने मला खाऊ घाली. तो तिखट रस्सा, भाकरी किंवा चतकोर चपातीची चळत, खीर अजूनही माझ्या जिभेवर आहेत.

बाळूबरोबरच्या माझ्या मैत्रीत मराठी साहित्याचा वाटा मोठा होता. बाळूचे वाचन अफाट होते. वि. स. खांडेकर, ना. सी. फडके, गो. नी. दांडेकर अशांची पुस्तके तो वाचे. वारणानगरमध्ये पुस्तकांची वानवा होती. मग काय करायचे? पुस्तके, मासिके कुठून मिळवायची? बाळूने मार्ग सुचवला. मुंबईत बॉम्बे बुक क्लब नावाचे दुकान होते. त्यांना मनिऑर्डरने पैसे पाठवून हवी ती पुस्तके मागवून घ्यायची सोय होती. अर्थात सर्व संवाद, व्यवहार, पोस्टानेच. (त्या काळात फोन – म्हणजे landline – फक्त चेअरमन, शाळेचे प्राचार्य अशा वजनदार लोकांच्याकडेच असे.) पण ही पुस्तके मागवायला पैसे कुठून आणायचे? बाळू म्हणाला आपण ग्रीटिंग कार्ड्स वगैरे विकून पैसे मिळवू शकतो. या सर्व चर्चेतून “ज्ञानपिपासू

विद्यार्थी संघ" जन्माला आला. बाळू अर्थातच त्याचा संस्थापक, प्रेरक, योजक वगैरे सर्वकाही होता. आणि आम्ही ७-८ जण शिपाईगडी म्हणून सामील झालो. बाळू म्हणेल ते करायचे इतके आमचे आयुष्य त्यावेळी सोपे होते!

ज्ञानपिपासू विद्यार्थी संघाचे ध्येय सरळसोट होते. दर्जेदार पुस्तके व मासिके मिळवून त्यांच्या वाचनातून अमोलिक ज्ञान मिळवणे व आमची वैचारिक प्रगती घडवून आणणे. अर्थातच हे ध्येय सर्वांना – पालक, शिक्षक यांना सुद्धा – पसंत पडण्याजोगे होते. त्यांनी आम्हाला पाठिंबा दिला. सुटीच्या दिवशी आम्ही मुलांनी एकत्र येऊन बनवलेली १००-२०० ग्रीटिंग कार्ड्स (जी बहुतेक अतिशय बाळबोध व सामान्य दर्जाची होती) या लोकांनी आनंदाने विकत घेतली. आमचा फंड उभा राहिला. आम्ही वाचकांसाठी वर्गणीदेखील लावली! झाले. लवकरच खांडेकरांच्या कादंबऱ्या, दांडेकरांची प्रवासवर्णने अशी पुस्तके बॉम्बे बुक क्लबकडून पोस्टाने येऊ लागली. बिरबल, टारझन, दक्षता, विचित्र विश्व, रम्यकथा अशी मासिकेही आम्ही सुरू केली. आमची वैचारिक प्रगती कितपत झाली हा वादाचा मुद्दा होईल, पण ज्ञानपिपासू संघाच्या कामामुळे माझी व बाळूची मैत्री अजून दृढ झाली आणि काही उत्तम साहित्य आमच्या नजरेखालून गेले हे नक्की.

बाळूला सिनेमाचे कमालीचे वेड होते आणि आजही आहे. वारणानगरमध्ये सिनेमा थिएटर नव्हते. केव्हातरी शास्त्री भवनमध्ये मराठी सिनेमे दाखवत. जवळच्या कोडोली गावात तंबूमध्ये बसून सिनेमा पाहायची सोय होती. म्हणजे असे की तंबूच्या मधोमध पडदा लावायचे व प्रेक्षक दोन्ही बाजूला बसून – तेही मातीत आपापले कापड पसरून – बघू शकत. प्रोजेक्टरच्या विरूद्ध बाजूला बसून पाहिले की mirror image दिसे. उजव्या हाताने काम करणारे डावखोरे दिसत, साडीच्या पदराची जागा बदलल्यामुळे मराठी मुली गुजराती दिसत, इत्यादी. बाळूचे एव्हढ्याने समाधान होण्यासारखे नव्हते. तो २० किमी अंतरावर असलेल्या कोल्हापूर शहरात

जाऊन मस्त ७० मिमी अशा वातानुकूलित थिएटरांत जाऊन हिंदी सिनेमे पाही. अमिताभ बच्चन, शत्रुघ्न सिन्हा हे त्याचे आवडते नट. कोल्हापुरात जाऊन सिनेमे पाहाण्याचा हा उपक्रम स्वस्त नव्हता. बसची तिकिटे, खाण्या-पिण्याचा खर्च. मग पूर्ण वसुली करायची म्हणून कधीकधी बाळू एका दिवसात ३ सिनेमे पाहायचा - १२ ते ३, ३ ते ६ आणि ६ ते ९! आणि कधी बसऐवजी तो काही मित्रांना घेऊन चक्क सायकलवर वाघबीळमार्गे कोल्हापूर व मग रातोरात परत अशी ही यात्रा करी!

सिनेमे अगदी अधाश्यासारखे पाहाणारे किंवा अविरत पुस्तके वाचणारे खूप असतात. पण मला वाटते, बाळूच्या या उद्योगांत एक वैशिष्ट्य होते, एक वेगळेपणा होता. केवळ कुठला विक्रम करण्यासाठी तो हे करत नव्हता. किंवा छान वाटते, करमणुक होते, थकल्या मनाला विरंगुळा मिळतो हाही भाग त्यात नसावा. या माध्यमांतले कलागुण – काव्य, संगीत, कथासूत्र इ. – त्याला मोहवायचेच. शिवाय प्रत्येक सिनेमा व पुस्तक यातली पात्रे, त्यांचे वागणे-बोलणे, त्यांची विचारपद्धती, वेगवेगळ्या समस्यांना तोंड देण्याची जिद्द व पद्धत, हे सर्व बाळू बारकाईने निरीक्षण करायचा व त्यातून त्याची स्वतःची विचारपद्धती develop करायचा. आजही त्याच्या बोलण्यात, लिहिण्यात एक फिल्मी, साहित्यिक टच असतो. डायलॉग मारल्यासारखी तो वाक्ये फेकतो. पण ते कौशल्य निव्वळ कॉपी केलेले नाही. त्याचे डायलॉग त्याचे स्वतःचे, ओरिजिनल असतात.

मी सहावीत असतानाच नवे प्राचार्य – श्री सॅम महाबळेश्वरवाला – शाळेत रूजू झाले. त्यांनी शाळेचे रंगरूप आणि आमचे सर्वांचे आयुष्य आमूलाग्र बदलून टाकले. बाळू आणि मी दोघेही त्यांच्या प्रेमात पडलो. त्यांच्याविषयी मी एक स्वतंत्र निबंध लिहिला असल्याने इथे फार लिहित नाही. पण प्राचार्यांची मर्जी संपादन करण्यासाठी आम्ही सर्वच झटू लागलो. प्राचार्यांनी बाळूचे वेगळेपण लगेच हेरले. त्याचे कला व नेतृत्व गुण, त्याची बौद्धिक झेप, त्याची sincerity, याचा त्यांना अंदाज आला. त्याच्या कौटुंबिक

परिस्थितीची त्यांनी माहिती करून घेतली, व त्याच्यावर खास लक्ष ठेवले. बाळूसारखे आदर्श असणारे (आणि माझ्यासारखे केव्हातरी आदर्श होण्याचे potential असावे अशी शंका वाटणारे) १०-१५ विद्यार्थी प्राचार्यांनी गोळा केले व त्यांचा एक ग्रूप बनवला. शाळेची प्राचार्य सांगतील ती कामे करणे हे या ग्रूपचे मिशन स्टेटमेन्ट होते. मग सुटीच्या दिवसात वसतिगृहाच्या नवीन admissions मध्ये मदत करणे, रोजच्या प्रार्थनेच्या वेळी मुलांची रहदारी मॅनेज करणे, शाळेच्या मोठ्या फळयावर विशेष वृत्त, माहिती व सुविचार लिहिणे, शिक्षकदिनाच्या दिवशी वारणानगरमधील झाडून सर्व शिक्षकांना – प्राथमिक शाळेच्या मास्तरांपासून ते प्राध्यापकांपर्यंत – अगदी सकाळी घरी जाऊन साखरेचे पुडे व त्याबरोबर एखादी प्राचार्यांनी खास निवडलेली कविता नेऊन देणे, अशी विविध कामे आम्ही केली. आणि हे सर्व रोज ८ ते ६ शाळा असूनही. त्या वयात आम्ही काय-काय केले याचा आज विचार केला तर अचंबा वाटतो. लहान वयात आणि तारूण्यात आपल्यात प्रचंड ऊर्जा असते आणि ती प्राचार्यांसारखा द्रष्टा शिक्षक योग्य ठिकाणी कारणी लावू शकतो हे एक निखळ आणि निर्विवाद सत्य आहे.

वर म्हटल्याप्रमाणे बाळू हा बहिरेवाडीचा रहिवासी. (या गावाचे मूळचे नाव भैरववाडी असावे, मग त्याचे भैरेवाडी झाले असा माझा कयास आहे.) अत्यंत सामान्य आर्थिक परिस्थितीत तो लहानाचा मोठा झाला. घरात शिक्षणाचा मागमूस नव्हता. त्याचा मोठा भाऊ आनंद हा एकटाच शिकला आणि पुढे भौतिकशास्त्रात डॉक्टरेट मिळवून प्राध्यापक झाला. बाकी सर्व – आईवडील व इतर भाऊ – अशिक्षित आणि कष्टाची कामे करून उदरनिर्वाह करणारे होते. बाळूकडे शाळेची फी भरण्यासही पैसे नव्हते. त्यामुळे अभ्यास करून स्कॉलरशिप मिळवून पैसे उभे करणे हाच मार्ग होता. घरात वीज नव्हती, त्यामुळे कंदिलाच्या प्रकाशात अभ्यास, वाचन करणे भाग होते. वाचनाची आवड होती पण वाचायला पुस्तके नव्हती. ग्रंथालयातून, मित्रांकडून किंवा शिक्षकांकडून मिळतील ती वाचणे असा बाळूचा पायंडा होता. बाळूला या सर्व परिस्थितीची पूर्ण जाणीव

होती. त्यामुळेच त्याच्या स्वभावात गांभीर्य, एक सुप्त कारूण्य होते. परिस्थितीशी झगडा देत पुढे जात राहायचे अशी दुर्दम्य उमेद होती, तसाच परिस्थितीशी जुळते घेण्याशिवाय कधीकधी पर्याय नसतो हा नम्रपणाही होता.

आज बाळूचे आयुष्य मागे वळून पाहिले तर ते या दोन गुणांचा – झगडा आणि स्वीकार – गुंतागुंतीचा आलेख असल्याचे स्पष्ट दिसते. त्याने परिस्थितीशी झगडा देत बरेच काही कमावले, बहुतेकांना अशक्य वाटतील अशा वैयक्तिक व व्यावसायिक आव्हानांचा सामना केला. दोन अगदी वेगवेगळया करियर्स – एक एअरफोर्समध्ये आणि दुसरी भारतीय करखात्यात – यशस्वी करून दाखवल्या. क्लास वन ऑफिसर झाला. वरिष्ठांचे कौतुक प्राप्त केले. स्वतःच्या मुलांना शिक्षणासाठी, त्यांच्या प्रगतीसाठी काहीही कमी पडू दिले नाही. पण परिस्थिती अशक्यप्राय झाली तेव्हा बाळूने काही गमावले देखील. आपल्या काही सुप्त इच्छांवर, आकांक्षांवर पाणी सोडले. लोकांचे विचित्र वागणे निमूटपणे सहन केले.

पण असे सर्व होऊनही बाळूची मूळची maturity अबाधित आहे. त्याचे नैसर्गिक नेतृत्वगुण अजूनही लोकांना त्याच्याकडे आकर्षित करतात. त्याचे साहित्यिक प्रेम व डायलॉग मारण्याचे कौशल्य टिकून आहे. मी अजूनही बाळूच्या प्रेमात आहे.

आज आम्ही जेव्हा भेटतो तेव्हा साहजिकच जुन्या गप्पा होतात, जुनी शल्ये उघडी होतात. बाळू माझ्याबरोबर बरंच काही share करतो, अगदी हातचं काही राखून न ठेवता बोलत जातो आणि ते हृदयाला भिडतं. त्यामुळे अजून माझा हृदय नामक अवयव काम करतोय याची जाणीव होऊन बरे वाटते! बाळूचे आयुष्य खूपच विविधरंगी, चढ-उतारांचे, खाचखळग्यांनी भरलेले असे आहे. त्याला अनेक कठीण प्रसंगांचा आणि व्यक्तींचा देखील सामना करत मार्गक्रम करावा लागला. त्याच्या मनात विषाद, खेद, काही

लोकांविषयी थोडा रागही आहे असे वाटते. त्याच्यासारख्या बुद्धिमान आणि संवेदनशील व्यक्तीच्या मनात अशा भावभावनांचा उद्रेक अधुनमधुन होत राहाणे हे साहजिक आहे. अशा आमच्यातल्या संवादांतून त्याचा निचरा होतो. त्याच्या बोलण्यात/लिहिण्यात त्याच्यातला साहित्यिक पदोपदी दिसतो. एकदा मला म्हणाला, "तसा तू अमेरिकावासी झालास की माझ्यासाठी दुर्मिळच असणार आहेस! अळवावरचं पाणी! पानावरही राहणार नाही आणि हातातही टिकणार नाही!"

मी स्वतःच्या आयुष्याकडे मागे वळून पाहातो तेव्हा मला जाणवते की मी किती भाग्यवान होतो आणि आहे. मी स्वतः कायकाय कमावले याचा हिशोब केला की दिसते की माझी सर्वात मोठी कमाई – जी खरे तर माझी नाहीच, ती नशीबाचीच बाब आहे – म्हणजे मला भेटलेल्या व्यक्ती. वारणेत मला मिळालेल्या मित्रांपैकी बाळूची भेट व मैत्री ही माझ्यासाठी सर्वात आनंदाची घटना होती. सुदैवाने आमच्यात साहित्याची आवड, रोमँटिक स्वभाव, सिनेमाची आवड, भारताविषयी प्रेम, मराठीविषयी प्रेम, वाचनाची आवड, प्राचार्यांविषयी कमालीचा आदर, आणि एकंदर जीवनाभिमुख दृष्टिकोन अशा अनेक जुळत्या गोष्टी होत्या. त्यामुळे त्या मैत्रीला, प्रेमाला अनेक सुंदर वाटा मिळाल्या.



मा. पा. उर्फ बाळू काशीद डावीकडून तिसरा

*लेखक: अभय बिंदुमाधव जोशी (abjoshi@yahoo.com)*